प्रेस नोट

दिनांक :— १८/०१/२०२४

**आर्थिक गुन्हे शाखा, मिरा भाईंदर वसई विरार आयुक्तालयातील पोलीस निरीक्षक व पोलीस हवालदार यांना लाच स्विकारताना अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे यांनी घेतले ताब्यात.......**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक, कलम | मिरारोड पोलीस स्टेशन |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, मिरा—भाईंदर, वसई—विरार पोलीस आयुक्तालय (पाहिजे आरोपी)<br>२) गणेश जगन्नाथ वनवे, पोहवा/०६००३, नेम. भाईंदर पोलीस स्टेशन (ताब्यात आरोपी) |
| मागितलेली लाचेची रक्कम | ५०,००,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५,००,०००/— रुपये |
| थोडक्यात हकीकत | यातील तक्रारदार यांचेविरुध्द नयानगर पोलीस स्टेशन येथे भा.द.वि.क. ४०६,४२०,३४ प्रमाणे दाखल गुन्हयाच्या तपासात तक्रारदार व त्यांचे अशील यांना सी.आर.पी.सी. १६० नुसार दिलेल्या नोटीसनुसार त्यांनी लोकसेवक क्र. १ शेलार यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांना सदर गुन्हयामध्ये त्यांचे स्वतःचे व त्यांचे अशील यांचे नाव न येण्याकरीता तसेच तक्रारदार यांचा दुसरा अशील जो सदर गुन्हयात अटक आहे त्यास जामीन देण्याकरीता व जामीन मंजुरीसाठी मदत करण्याकरीता वरील नमुद आरोपी लोकसेवक क्र. १) पोनिरी/महेंद्र शेलार यांनी तक्रारदार यांच्याकडे ५०,००,०००/— रुपये (पन्नास लाख रुपये) लाचेच्या रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती ३५,००,०००/— रुपये (पस्तीस लाख रुपये ) लाचेच्या रक्कमेची मागणी करत असल्याबाबतची तक्रार ॲसीबी ठाणे कार्यालयास दिली होती.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. १७/०१/२०२४ रोजी पडताळणी केली असता, वरील नमुद आरोपी लोकसेवक क्र. **०१) पोनिरी/महेंद्र शेलार** यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेवरुन ॲसीबी ठाणे युनिटने सापळा कारवाईचे आयोजन केले असता आरोपी क्र. १ यांचे वतीने आरोपी लोकसेवक क्र. २ पोहवा/गणेश वनवे यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेचा पहिला हप्ता म्हणुन १५,००,०००/— रुपये स्विकारुन ते त्यांचे कारमधुन पळुन जात असताना त्यांना सुरभी कॉम्पलेक्स मिरारोड पुर्व याठिकाणी रंगेहात पकडण्यात आले.<br>सदर बाबत गुन्हा दाखल करण्याबाबतचे कामकाज मिरारोड पोलीस स्टेशन येथे चालु आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी— मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा. श्री. सुधाकर सुराडकर, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा

---

संपर्क पत्ता :— लाप्रवि ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ :—acbmaharastra@mahapolice.gov.in
**ईमेल**—spacbthane@mahapolice. Gov.in
ॲप्लीकेशन —acbmaharastra.net,
टोल फ्रि नंबर —१०६४, दुरध्वनी क्रमांक —०२२—२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्ॲप्स् क्रमांक —९९३०९९७७००
दिनांक :— १८/०१/२०२४

( अश्विनी पाटील )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे.